शासनाच्या मालकीच्या (विमान व हेलिकॉप्टर) हवाई वाहनांकरीता <u>विमानचालन व्यवस्थापन सेवा</u> (Aviation management Service) पुरविण्याच्या करारास मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. विचासं-१११९/प्र.क्र.१७/विमान-१
मंत्रालय (विस्तार इमारत), सातवा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
दिनांक :३०/१०/२०२६

<u>वाचा</u> :- १) उपसंचालक, विमान चालन संचालनालय यांची पत्र क्र.१)डीए /एडीएम/५५५/२०२६, दिनांक १०/०७/२०२६ व क्र.२) डीए /एडीएम/७४२/२०२६, दिनांक २३/१०/२०२६.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक विचासं-१११९/प्र.क्र.१७ / २८-अ (विमान-१), दिनांक ०१/०४/२०२५
३) मे. ॲरो एअरक्राफ्ट सेल्स ॲण्ड चार्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या समवेत दिनांक १३ /०४ /२०२३ रोजी केलेला करार.

<u>प्रस्तावना :-</u>

शासकीय विमान सेसना सायटेशन ५६० एक्सएलएस व्हीटी-व्हीडीडी व शासकीय हेलीकॉप्टर एअरबस एच-१४५ व्हीटी-जीओव्ही या हवाई वाहनांकरीता विमानचालन व्यवस्थापन सेवा पुरविण्याकरीता मे.ॲरो एअरक्राप्ट सेल्स ॲण्ड चार्टर्स प्रा.लि.,नवी दिल्ली या कंपनीसमवेत करण्यात आलेल्या करारनाम्यास जुन्या अटी, शर्ती व दरपत्रकानुसार दि.१/०४/२०२५पासून दि.३१/०३/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.११/०३/२०२५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला असून शासन निर्णय दि.०१ एप्रिल, २०२५ अन्वये सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

विमान व हेलीकॉप्टर या हवाई वाहनांकरीता विमानचालन व्यवस्थापन सेवा संदर्भात शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १०/०७/२०२५ रोजीच्या बैठकीत विमान व हेलीकॉप्टरच्या व्यवस्थापन व वैमानिक सेवा यासाठी दोन स्वतंत्र निविदा न काढता एकच निवीदा प्रक्रीया महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने राबवावी, असा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयानुसार नवीन निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी व विमानचालन संचालनालयाकडून स्वतंत्ररित्या सुरु आहे. सदर कार्यवाहीस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

यास्तव वरील कंपनीसमवेत करण्यात आलेल्या करारास मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

शासकीय विमान सेसना सायटेशन ५६० एक्सएलएस व्हीटी-व्हीडीडी व शासकीय हेलीकॉप्टर एअरबस एच-१४५ व्हीटी-जीओव्ही या हवाई वाहनांकरीता विमानचालन व्यवस्थापन सेवा पुरविण्याकरीता ॲरो एअरक्राप्ट सेल्स ॲण्ड चार्टर्स प्रा.लि.,नवी दिल्ली या कंपनीसमवेत करण्यात आलेल्या करारनाम्यास जुन्या अटी, शर्ती व दरपत्रकानुसार दि.०१/०४/२०२६ पासून दि.३१/१२/२०२६ पर्यंत नुतनीकरण करण्यास, संदर्भ क्रमांक ३ मध्ये नमुद केलेल्या करारातील परिच्छेद क्र. १६ मधील मुद्दा क्र. ११.५ मधील तरतूदीनूसार संचालक, विमानचालन संचालनालय यांना मान्यता देण्यात येत आहे.

२. या बाबतचा होणारा खर्च मागणी क्र.ए-४. "२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) विमान चालन सल्लागार, महाराष्ट्र शासन (अनिवार्य) २०७० ०१५६" या लेखाशिर्षातंर्गत ५०-इतर खर्च या उद्दिष्टाखाली संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६१०३०१११३२६३६०७ हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VARSHA SANDEEP TANDEL

Digitally signed by VARSHA SANDEEP TANDEL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD,
2.5.4.20=88DDA02271A3AA8E76A7AECF8D6EFC85CB3482A471B1F362CC2
A2DF648E88405, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=4AD1C69F882FC4BFCFD7FE76EF3A536040E61D009CA9A87
AF4CBDB0B0A3E8EF1, cn=VARSHA SANDEEP TANDEL
Date: 2026.10.30 11:15:21 +05'30'

(वर्षा तांडेल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित , मुंबई.
२. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई.
३. उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. सामान्य प्रशासन विभाग / कार्या. २५, मंत्रालय, मुंबई
९. निवड नस्ती (विमान-१)